# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३५९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०७/२०१८

**१) संगनमत करुन जनावरांना निर्दयतेची वागणुक देवुन वाहतुक करतांनी व १ गायीचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद —**

दिनांक १४/०७/२०१८चे ०४.३० वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे सोबत्या सह ताब्यातील टाटा झेनान पिकअप गाडी मध्ये अवैद्यरित्या लहान मोठे ११ गायी व १ गोरा(जनावरे) किंमती १,०५,०००/—रु. चे कोंडुन त्यांना निर्दयतेची वागणुक देवुन वाहतुक करित असतांनी यातील १ गायीचे मरणास कारणीभुत झाल्याने व त्यांचे पासुन जनावरे व टाटा झेनान पिकअप गाडी किंमती ४,५०,०००/रु. असा एकुण ५,५५,०००/—रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. मेहर जिल्हा रेड पथक पो. अधी कार्या भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४२९,३४ भादवी. सहकलम ११(१)(ड)प्रा.नि.का.का. सहकलम ९ म. प्रा. सं. का. सहकलम ८३ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. आडे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) संगनमत करुन जनावरांना निदर्यतेची वागणुक देवुन बेकायदेशीर रित्या कत्तल करण्याचे उद्‌देशाने सोबत लायसन्स न बाळगता मिळुन आल्याने गुन्हा नोंद —**

दिनांक १४/०७/२०१८ चे ०४.०० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन त्याचे ताब्यातील ट्रक सीजी ०४ जे ५७९० मध्ये चालक व मालकांनी संगनमत करुन ताब्यातील ट्रक मध्ये एकुण म्हसी किंमती ८,००,०००/—रु. ची जनावरे डांबुन, कोंबुन त्यांना निर्दतेची वागणुक देवुन बेकायदेशीर रित्या कत्तल करण्याचा उद्‌देशाने सोबत लाससन्स न बाळगता बेकायदेशीर रित्या वाहतुक करतांनी मिळुन आल्याने आरोपी पासून ट्रक व म्हसी असा एकुण १८,००,०००/—रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. आडोळे जिल्हा रेड पथक पो. अधी.कार्या भंडारा याचे लेखी रिपोर्ट व कागदपत्रावरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ११(१)(ड)(इ)प्रा. नि. वा. का. सहकलम १३०(१), १३०(३)/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) सोन्याचे दागीने व नगदी पैश्याची चोरी : —**

दिनांक ०५/०५/०१८ चे १३.३० ते २०/०६/०१८ पर्यन्त यातील फिर्यादी सौ. कामना सुरेश कौरानी वय ४० वर्ष, रा. जगन्नाथ अपार्टमेन्ट प्लॉट नं. ३०१ नंदुरकर हाऊस शास्त्री नगर भंडारा याचे घरी संशयीत आरोपी ही मोलकरीनचे काम करित असुन फिर्यादीचे घरातील लाकडी आलमारीम ठेवलेले नगदी २०,०००/—रु. व सोन्याचा गळयातील हार ०३ तोळे किंमती ९०,०००/—रु. सोन्याचे कंगन ०३ तोळे किंमती ९०,०००/—रु., असा एकुण २,००,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४)एनडीपीएस यांची कारवाई : —**

दिनांक १३/०७/०१८ चे १९.४५ वाजता दरम्यान यातील जुने घराची झडती अम्ली पदार्थ बाबत घेतली असता १० पेपरचे कागदपत्रे पुडया मध्ये एकुण १०० ग्रॅम गांजा किंमती १,०००/—रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनि. काळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २०(ब)एनडीपीएस ॲक्ट. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु : —**

दिनांक १४/०७/२०१८ चे ०९.०० ते १६.०० वाजता दरम्यान यातील मृतक अशोक हरिभाऊ सेलोकर वय ५० वर्ष, रा. माटोरा याने विषारी औशध प्राशन करुन त्याची प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचाराकरीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावला. मृतक याचेवर महींद्रा कंम्पनी व ॲक्सीस बॅकेचे कर्ज होते त्या कर्जामुळे मृतकने विषारी औषध प्राशन करुन आत्महत्या केली आहे. अशा फिर्यादी वसंता हरिभाऊ सेलोकर वय ४६ वर्ष, रा. माटोरा यांचे तोंडी रिपोर्ट व डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सलोकर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**६) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु : –**

दिनांक १४/०७/२०१८ चे १९.३० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. प्रमीलाबाई गोपीचंद मेश्राम वय ६० वर्ष, रा. गराडा बु. हिने वाताच्या बिमारीला कंटाळुन दिंनाक ११/०७/२०१८ रोजी विषारी औषध प्राशन केल्याने तिला औषधोपचारा करिता सामान्य रुग्नालय भंडारा येथे आयसीयु वार्डात भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने फिर्यादी गोपीचंद केसरी मेश्राम वय ६८ वर्ष, रा. गराडा बु. यांचे तोंडी व डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मुटकुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**७) विषारी औषध प्राशन केल्याने इसमाचा मृत्यु : –**

दिनांक १४/०७/२०१८ चे १२.०० वाजता पुर्वी यातील मृतक देविदास निलकंठ वरंबे वय ५५ वर्ष, रा. मंगळवारी वार्ड पवनी हा दारु पिण्याचे सवईचा असुन त्यांन दारुचे नशेत विषारी औषध थिमेट प्राशन करुन मरण पावल्याने फिर्यादी विशाल देविदास वरंबे वय २४ वर्ष, रा. मंगळवारी वार्ड पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**८) उपचारा दरम्यान युवकांचा मृत्यु : –**

दिनांक १३/०७/२०१८ चे १७.१५ वाजता पुर्वी यातील मृतक गणेश मनोहर नंदनवार वय २५ वर्ष रा. पालांदुर याची फुड पायझींग मुळे प्रकृती खराब होवुन त्यास औषधोपचाराकरिता सामान्य रुग्नालय भंडारा येथे दिंनाक १२/०७/२०१८ चे १३.५४ वा वार्ड क्र. ९ मध्ये भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक १३/०७/२०१८ चे १७.१५ वा मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौचे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मेश्राम यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**९) विहीरीचे पाण्यात कुदुन इसमाचा मृत्यु : –**

दिनांक १४/०७/२०१८ चे ०६.३० वाजता पुर्वी यातील मृतक भेदीलाल रामचंद्र गायधने वय ३२ वर्ष, रा. पेट्रोलपंप ठाणा हा दिनांक १४/०७/२०१८ चे सकाळी ०६.३० वा घरुन फिरण्या करिता निघाला होता त्याला २–३ महिन्यापासुन डोक्याचा त्रास असल्याने वेडसर वागत होता व त्याला फिटची बिमारी होती त्या त्रासामुळे मृतक हा विहीरीत कुदुन मरण पावल्याने फिर्यादी हेमराज रामचंद्र गायधने वय ३२ वर्ष, रा. पेट्रोलपंप ठाणा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**१०) नायलॉन दोरीने गळफास लावुन इसमाचा मृत्यु : –**

दिनांक १४/०७/२०१८ चे १३.०० वाजता पुर्वी यातील मृतक विजय वसंतराव लेंडे वय ४४ वर्ष, रा. मोहगाव देवी ह. मु. भंडारा हा फिर्यादीचा मोठा भाऊ असुन हल्ली तो परिवारासह भंडारा येथे किरायाने राहत होता तसेच अंदाजे ५ ते ६ वर्षापासुन मानसिक रोगी होता त्याची प्रकृती बरी नसल्याने भंडारा व वरठी येथील डॉक्टराकडे उपचार सुरु होता व मृतक हा स्वगावी होता फिर्यादी व त्याची पत्नी रोवणा करणे कामी शेतावर गेले असता यातील मृतकने घराचे मागे असलेल्या स्टोअर रुम मध्ये फाटयाला नायलॉन दोरीने गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी विनोद वसंतराव लेंडे वय ४२ वर्ष, रा. मोहगांव देवी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**११) नायलॉन दोरीने गळफास लावुन इसमाचा मृत्यु : –**

दिनांक १४/०७/२०१८ चे १३.१५ ते १३.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे वडील मृतक प्रमोद शिवराम मेश्राम वय ५० वर्ष, रा. पालोरा याने घराच्या आळयाला नायलॉन दोरीने गळफास लावुन आम्तहत्या केल्याने फिर्यादी वृषभ प्रमोद मेश्राम वय २१ वर्ष, रा. पालोरा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. गेडाम पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**१२) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

**अ)**दिनांक १४/०७/२०१८ चे १६.५७ ते १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे स्पलेन्डर प्रो मोटार सायकल ही बावणकर चौक येथे सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. ठवरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. ठवरे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**ब)** दिनांक १४/०७/२०१८ चे १८.००ते १८.३५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील हिरो होंडा स्पलेंन्डर प्लस ही गजाज वार्ड तुमसर येथे सार्वजनिक रोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. भुते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भुते पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**१३) अवैध हातभट्टी व देशी दारु अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १४/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा,तुमसर, सिहोरा, साकोली, पवनी व अडयाळ येथे अवैध हातभट्टी व देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५५५ लिटर हातभट्टी दारु+ ६४४० किलो सडवा + साहित्य किंमती ४,४१,०४०/–रु. तसेच ५८ लिटर ५६० देशी/विदेशी दारु किंमती २,४२,२५५/ रु.माल असा एकुण किंमती ४,६५,२९५/–रु. चा मला जप्त करण्यात आला.

**१४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १४/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १४५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनाकरीता– १६ ईतर वाहनांवरती – १२९ केसेस करण्यात आले आहे.

Chouhan
ASI 466

**(सफौ. व्ही.आर.चव्हाण)**
**नियत्रंण कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०६७३४१९८**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आह

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.